# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ७४८/२०२१/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब सोमा जाधव,<br>मु.पो.टाकळीमियॉं,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>सहायक कुलसचिव (प्रशासन),<br>महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>उप कुलसचिव (प्रशासन),<br>महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,<br>ता.राहुरी, जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक - २५/०३/२०२२**

तक्रारदार यांनी दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २५/०३/२०२२ रोजी meet.google.com/fyg-bdzv-aty या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०४/१२/२०१८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १०३२/२०१९/अहमदनगर वरील निर्णय दिनांक ३१/०८/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०४/१२/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी." तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार अद्याप माहिती पुरविली नसल्याने मागितलेली माहिती मिळावी, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक १०३२/२०१९/अहमदनगर वरील दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन तक्रारदारास माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक १०३२/२०१९/अहमदनगर वरील दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. तसेच सुनावणीदरम्यान तक्रारदार यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येते. त्यामुळे द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक १०३२/२०१९/अहमदनगर वरील दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या पारीत आदेशास अनुसरुन माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येते. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत तक्रार क्रमांक ७४८/२०२१/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.संजय घाडगे (द्वितीय अपील सुनावणीवेळचे जन माहिती अधिकारी) सहायक कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.७४८/२०२१/अहमदनगर/ ओ- १५३२ दिनांक- १०/०८/2022